(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष)

अधिवेशनाचा शुभारंभ 'वंदे मातरम्' या गीताच्या समूह गायनाने झाला.

………..

म.वि.स. नियम ५७ अन्वयेच्या सूचनेबाबत

श्री.देवेंद्र फडणवीस (विरोधी पक्ष नेते) : अध्यक्ष महोदय, मी म.वि.स. नियम ५७ अन्वये सूचना दिलेली आहे. [***] ... (अडथळा) ...

असुधारित प्रत

*** आदेशानुसार विलोपित मजकूर.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य कापडी फलक फडकवितात.)

(दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य आपल्या जागेवर उभे राहून घोषणा देतात.)

उपाध्यक्ष : उक्त सूचनांच्या संदर्भात नमूद करण्यात येते की, महाराष्ट्र विधानसभा नियम ५७ नुसार कोणत्याही सदस्याला, माननीय अध्यक्षांच्या संमतीने कोणताही नियम सभागृहापुढील कोणत्याही विशिष्ट प्रस्तावास तो लागू करताना स्थगित करण्यात यावा असा प्रस्ताव मांडता येईल आणि प्रस्ताव मंजूर झाला तर संबंधित नियम त्या वेळेपुरता स्थगित होईल. परंतु, आज दिनांक ३ मार्च, २०२२ रोजी माननीय राज्यपालांचे अभिभाषण झालेले आहे. त्यामुळे सदरहू सूचना अमान्य करण्यात येत आहेत.

....

असुधारित प्रत

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य कापडी फलक फडकवितात.)

(दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य आपल्या जागेवर उभे राहून घोषणा देतात.)

पृ.शी./मु.शी. : राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवणे

प्रधान सचिव : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त सभेत आज, गुरुवार, दिनांक ३ मार्च, २०२२ रोजी राज्यपाल महोदयांनी केलेल्या अभिभाषणाची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपाध्यक्ष : विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त सभेत राज्यपाल महोदयांनी केलेल्या अभिभाषणाची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेले अभिभाषण छापावे.)

....

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

पृ. शी. : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शन

मु. शी. : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शन करणारा श्री. सुनिल प्रभू यांचा प्रस्ताव

श्री. सुनिल प्रभू (दिंडोशी) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो :-

"राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधानसभेचे सदस्य, त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो."

श्री. अनिल पाटील (अमळनेर) : अध्यक्ष महोदय, श्री. सुनिल प्रभू यांनी मांडलेल्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास मी दुजोरा देतो.

उपाध्यक्ष : प्रस्ताव असा आहे की :--

"राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधानसभेचे सदस्य, त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो."

या प्रस्तावावर शुक्रवार, दिनांक ४ मार्च, २०२२ व शनिवार, दिनांक ५ मार्च, २०२२ रोजी चर्चा होईल. या प्रस्तावास ज्या सन्माननीय सदस्यांना सुधारणा सुचवावयाच्या असतील त्यांनी त्या सुधारणांच्या सूचना ३ प्रतींमध्ये 'अ' कक्ष, कक्ष क्रमांक ११०३, अकरावा मजला, विधान भवन, मुंबई येथे किंवा a1.assembly.mls@gmail.com या ई-मेलवर (DVOT-Surekh या Font मध्ये) आज गुरुवार, दिनांक ३ मार्च, २०२२ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी पोहोचतील या बेताने पाठवाव्यात.

असुधारित प्रत

पृ.शी. /मु.शी. : अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

श्री. एकनाथ शिंदे (नगर विकास मंत्री): अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने

क) सन २०२२ चा अध्यादेश क्रमांक १, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर) आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) अध्यादेश, २०२२

ख) सन २०२२ चा अध्यादेश क्रमांक २ – मुंबई महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०२२ सभागृहासमोर ठेवतो.

उपाध्यक्ष : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

असुधारित प्रत

पृ.शी./मु.शी. : सन २०२१-२०२२ च्या पुरवणी मागण्या सादर करणे.

श्री. अजित पवार (उप मुख्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२१-२०२२ च्या पुरवणी मागण्या सभागृहापुढे सादर करतो आणि तसे करीत असताना आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०५ व २०३ खंड (३) खाली मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल यांनी सन २०२१-२०२२ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस केली आहे.

उपाध्यक्ष : सन २०२१-२०२२ च्या पुरवणी मागण्या सभागृहाला सादर करण्यात आल्या आहेत. पुरवणी मागण्यांचे विवरणपत्र सन्माननीय सदस्यांना महाराष्ट्र विधानमंडळाच्या व शासनाच्या संकेतस्थळावरुन तसेच टपाल खणाद्वारे उपलब्ध करुन देण्यात येत आहे. या मागण्यांवर चर्चा व मतदान दिनांक ७ व ८ मार्च, २०२२ रोजी होईल. दिनांक ७ मार्च, २०२२ रोजी चर्चा व मतदानासाठी जे विभाग प्राथम्यक्रमांत घेण्यात येतील त्या विभागांवरील कपात सूचना दिनांक ५ मार्च, २०२२ रोजी व दिनांक ८ मार्च, २०२२ रोजी चर्चा व मतदानासाठी जे विभाग प्राथम्यक्रमांत घेण्यात येतील त्या विभागांवरील कपात सूचना दिनांक ७ मार्च, २०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील.

असुधारित प्रत

पृ.शी.: सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक.
मु.शी.: सन २०२१ चे वि.स.वि.क्रमांक ३९ च्या संबंधात माननीय राज्यपाल यांच्याकडून आलेला संदेश.

उपाध्यक्ष : माननीय राज्यपाल यांच्याकडून एक संदेश आलेला आहे. प्रधान सचिव तो वाचून दाखवतील.

संदेश

प्रधान सचिव : अध्यक्ष महोदय, सन २०२१ चे वि.स.वि.क्रमांक-३९, महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२१ च्या संबंधात माननीय राज्यपाल यांच्याकडून प्राप्त झालेला दिनांक १७ फेब्रुवारी, २०२२ रोजीचा संदेश पुढीलप्रमाणे आहे :-

"The Maharashtra Co-operative Societies (Third Amendment) Bill, 2021 has been presented for my assent under Article 200 of the Constitution of India.

Kindly reconsider the amendment proposed to Section 157 of the Maharashtra Co-operative Societies Act, 1960, in the Bill.".

अस्धारित प्रत

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.दिलीप वळसे-पाटील (गृह मंत्री) : अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये सुरुवातीला नियम ५७ अन्वये माननीय विरोधी पक्ष नेता यांनी सूचना मांडण्याचा प्रयत्न करीत असताना जे शब्द रेकॉर्डवर आले आहेत ते सर्व शब्द रेकॉर्डवरुन काढून टाकावेत, अशी माझी विनंती आहे.

उपाध्यक्ष : मी नियम ५७ च्या सूचना अस्वीकृत केल्या आहेत त्यामुळे याबाबतीतील जे शब्द रेकॉर्डवर आले आहेत, ते विलोपित करण्यात यावेत.

यानंतर श्री.तेलंग...

असुधारित प्रत

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून घोषणा देतात.)

पृ.शी./मु.शी.: विधेयकांना संमती व अधिसंमती

उपाध्यक्ष : विधानसभेने संमत केलेल्या विधेयकांना विधानपरिषदेची संमती व दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राष्ट्रपती/राज्यपालांची अधिसंमती मिळाल्यासंबंधीची यादी प्रधान सचिव वाचून दाखवतील.

प्रधान सचिव : (अ) खालील विधेयके विधानपरिषदेने कोणत्याही सुधारणेशिवाय संमत केली : -

१) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ - शक्ती फौजदारी कायदा (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२०

२) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २० - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२१

३) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२१

४) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२१

५) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०२१

६) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२१

७) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२१

८) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२१

असुधारित प्रत

प्रधान सचिव......

९) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२१

१०) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८ महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२१

११) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ - महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (सुधारणा) विधेयक, २०२१

१२) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ - महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन (सुधारणा) विधेयक, २०२१

१३) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ - मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२१

१४) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२१

१५) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२१

१६) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ - महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२१

१७) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१ - महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) विधेयक, २०२१

(ब) खालील विधेयके विधानपरिषदेने कोणत्याही शिफारशीशिवाय परत केली :-

१) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२१

असुधारित प्रत

प्रधान सचिव......

२) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ - महाराष्ट्र मुद्रांक (दुसरी सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२१

३) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४० - महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२१

(क) खालील विधेयकाला राष्ट्रपतींची अधिसंमती मिळाली :-

सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७ - भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२०

(ड) खालील विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाली :-

१) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २० - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२१

२) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२१.

३) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२१

४) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०२१

५) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२१

६) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२१

असुधारित प्रत

प्रधान सचिव......

७) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२१

८) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२१

९) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२१

१०) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ - महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (सुधारणा) विधेयक, २०२१

११) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ - महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन (सुधारणा) विधेयक, २०२१

१२) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ - मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२१

१३) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२१

१४) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ - महाराष्ट्र मुद्रांक (दुसरी सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२१

१५) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४० - महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२१

१६) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१ - महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) विधेयक, २०२१

१७) सन २०२१ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ३ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२१

असुधारित प्रत

प्रधान सचिव......

१८) सन २०२१ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ४ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२१

१९) सन २०२१ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०२१

२०) सन २०२१ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ६ - महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ विधेयक, २०२१

यानंतर श्री.कुलकर्णी.......

असुधारित प्रत

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य घोषणा देतात.)

पृ.शी./मु.शी. : सभाध्यक्ष तालिका नामनिर्देशित करणे

उपाध्यक्ष : मी महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम ८(१) अन्वये खालील सदस्यांना सभाध्यक्ष तालिकेवर नामनिर्देशित केल्याचे घोषित करतो :-

१) श्री. भास्कर जाधव, वि.स.स.

२) श्री. संजय शिरसाट, वि.स.स.

३) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

४) श्री. कुणाल पाटील, वि.स.स.

५) श्री. कालिदास कोळंबकर, वि.स.स.

असुधारित प्रत

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य घोषणा देतात.)

पृ.शी./मु.शी. : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे व संमत करणे

श्री. दौलत दरोडा (समिती प्रमुख) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो.

शुक्रवार, दिनांक ४ मार्च, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय ठरावांना द्यावयाचा वेळ ठरविण्यासाठी समितीची बैठक झाली.

अशासकीय कामकाजासाठी एकूण अडीच तासांचा वेळ उपलब्ध आहे. विधानसभेकडे मागील अधिवेशनातील पुर:स्थापनार्थ एकूण ०४ अशासकीय विधेयके आहेत. त्यांना १० मिनिटांचा वेळ देण्यात यावा व उर्वरित १४० मिनिटांचा वेळ पुढीलप्रमाणे अशासकीय ठरावांना देण्यात यावा.

१) श्री. गणेश नाईक, वि.स.स. यांचा ठराव क्र. २१८	२३ मिनिटांपेक्षा जास्त नाही.
२) श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांचा ठराव क्र. ५५	२३ मिनिटांपेक्षा जास्त नाही.
३) श्री. राणाजगजितसिंह पाटील, वि.स.स. यांचा ठराव क्र ६५	२३ मिनिटांपेक्षा जास्त नाही.
४) श्री. समीर मेघे, वि.स.स. यांचा ठराव क्र. ३९	२३ मिनिटांपेक्षा जास्त नाही.
५) श्री. सुरेश भोळे, वि.स.स. यांचा ठराव क्र. ४४	२३ मिनिटांपेक्षा जास्त नाही.
६) श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांचा ठराव क्र. १८८	२५ मिनिटांपेक्षा जास्त नाही.

यापैकी कोणत्याही ठरावाचा वेळ वाचल्यास तो त्या पुढील क्रमांकाच्या ठरावाला देण्यात यावा, अशीही समितीने शिफारस केली आहे.

असुधारित प्रत

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य घोषणा देतात.)

उपाध्यक्ष : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले आहे.

श्री. दौलत दरोडा (समिती प्रमुख) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला संमत आहे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत

पृ.शी. : शोक प्रस्ताव

मु.शी. : भारतरत्न स्वरसम्राज्ञी लता दिनानाथ मंगेशकर, उद्योगपती राहुल कमलनयन बजाज, श्री. नारायण ज्ञानदेव पाटील, माजी वि.स.स. व माजी मंत्री, सर्वश्री गजानन धरमशी बाबर, विश्वासराव आत्माराम पाटील, नरेंद्रसिंग भगतसिंग पाडवी, माजी वि.स.स. व श्रीमती आशाताई मारोतीअप्पा टाले, माजी वि.स.स. यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव

उपाध्यक्ष : भारतरत्न स्वरसम्राज्ञी लता दिनानाथ मंगेशकर, उद्योगपती राहुल कमलनयन बजाज, श्री. नारायण ज्ञानदेव पाटील, माजी वि.स.स. व माजी मंत्री, सर्वश्री गजानन धरमशी बाबर, विश्वासराव आत्माराम पाटील, नरेंद्रसिंग भगतसिंग पाडवी, माजी वि.स.स. व श्रीमती आशाताई मारोतीअप्पा टाले, माजी वि.स.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते.

भारतरत्न स्वरसम्राज्ञी लता दिनानाथ मंगेशकर यांचा जन्म दिनांक २८ सप्टेंबर १९२९ रोजी इंदोर येथे झाला. मास्टर दिनानाथ मंगेशकर यांच्या स्वर्गीय संगीताचा वारसा घेऊन जन्माला आलेली मंगेशकर भावंडे ही भारताच्या आणि मराठीच्या ललाटीची वैभवच आहेत. लता मंगेशकर या वैभवाच्या शिरोमणी होत्या. प्रत्येक लहानसहान गोष्टींमध्ये परिपूर्णतेचा ध्यास, गाण्याची उपजत समज असली तरीही कठोर मेहनतीची तयारी या सर्व सामर्थ्यातून त्यांनी स्वकर्तृत्वाने संगीताचे अवघे आकाश व्यापून टाकले होते.

यानंतर श्री. चौधरी....

उपाध्यक्ष.....

लता मंगेशकर नावाच्या सात अक्षरी सप्तस्वरांनी गेली आठ दशके जगभरातील संगीत प्रेमींचे, सामान्यांचे भावविश्व समृध्द केले आहे. पन्नासच्या दशकापासून पुढील सर्व पिढया दीदींच्या स्वरवैभवाची श्रीमंती सांगतच जगणार आहेत. हिंदी-मराठी तसेच इतर अनेक भाषांमध्ये चित्रपट गीतांच्या पलीकडे दीदींच्या स्वरांचे साम्राज्य जेवढे मोठे होते तेवढेच ते तेजस्वीही होते. त्यांनी गायलेली "मीरेची भजने", "राम-श्याम गुणगाण", "ज्ञानेश्वरांच्या विराण्या", "संतांचे अभंग" अशी शेकडो गाणी भारतीयांच्या जगण्याचा भाग झाली आहेत. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांचे पसायदान दीदींनी आपल्या स्वर वैभवाने लाखो लोकांना अर्पित केले आहे.

कै.लता मंगेशकर यांनी केवळ संगीत क्षेत्रात कार्य केले असे नाही तर त्यांनी सामाजिक बांधीलकी जपत अनेक गोर-गरीब तसेच संकटात सापडलेल्यांना मदतीचा हात दिला आहे. पुण्यामधील पानशेत धरण पूरग्रस्तांसाठी मदत, चीन आक्रमणाच्या वेळी राष्ट्रीय संरक्षण निधीसाठी मदत, बाबा आमटे यांच्या आनंदवनासाठी मदत, कारगील युध्दाच्या वेळी जवानांसाठी मदत अशी अनेक उदाहरणे देता येतील. मंगेशकर कुटुंबियांचे दातृत्व सर्वज्ञात आहे.

कै.लता मंगेशकर या सन १९९९ ते २००५ या कालावधीत राज्यसभेच्या नामनियुक्त सदस्या होत्या. त्यांना असंख्य पुरस्कारांनी गौरविण्यात आले होते. सन १९६९ साली भारत सरकारने त्यांना 'पद्मभूषण', १९९९ साली 'पद्मविभूषण' तर २००१ साली सर्वोच्च समजला जाणारा 'भारतरत्न' हा किताब देऊन गौरविले. सन १९८९ मध्ये त्यांना भारतीय चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च 'दादासाहेब फाळके पुरस्कार' प्रदान करण्यात आला. संगीत क्षेत्रातील अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानीत करण्यात आले होते. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, जवाहरलाल नेहरु विद्यापीठ, हैद्राबाद, सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे यांनी त्यांना मानद "डि.लिट." ही पदवी प्रदान केली होती.

उपाध्यक्ष.....

अशा या असामान्य, महान, अद्भूत, अद्वितीय, केवळ भारतातीलच नव्हे तर जगभरातील संगीतप्रेमींच्या मनावर 'अधिराज्य' गाजविणाऱ्या स्वरसम्राज्ञीचे रविवार, दिनांक ६ फेब्रुवारी, २०२२ रोजी दु:खद निधन झाले.

कै. राहुल कमलनयन बजाज यांचा जन्म दिनांक १० जून, १९३८ रोजी पश्चिम बंगालमध्ये कलकत्ता येथे झाला. त्यांनी दिल्ली विद्यापीठातून अर्थशास्त्राची पदवी, मुंबई विद्यापीठातून कायद्याची पदवी तसेच हार्वर्ड बिजनेस स्कूलमधून एम.बी.ए. पदवी संपादन केली होती. आयआयटी सह सात विद्यापीठांनी त्यांना मानद डॉक्टरेट बहाल केली होती.

कै.बजाज यांनी १९६५ मध्ये बजाज समुहाची सूत्रे हाती घेतली. बजाज समुहाला पाच दशकांहून अधिक काळ भारतीय औद्यागिक क्षेत्रात आघाडीवर ठेवण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. त्यांच्या सक्षम नेतृत्वाखाली बजाज औद्योगिक समुहाने यशाची अनेक शिखरे पादाक्रांत केली आहेत. दुचाकी वाहनांच्या निर्मितीमध्ये बजाज समुहाने 'हमारा बजाज' ही संकल्पना प्रत्येक घराघरात आणि प्रत्येकाच्या मनामनात रुजविली. ऑटोमोबाईल म्हणजे वाहन क्षेत्रात बजाज उद्योगाने क्रांती घडवून आणली. बजाज उद्योग समुहाने दुचाकी बरोबरच तीनचाकी रिक्षा बाजारात आणल्या. त्यामुळे देशातील कोट्यावधी बेरोजगार तरूणांना रोजगार मिळाला. पुण्याशेजारी पिंपरी आणि औरंगाबाद मधील वाळुंज औद्योगिक क्षेत्रात 'बजाज ऑटोच्या' आधाराने अनेक लघु उद्योग बहरले. कै.बजाज यांनी अर्थव्यवस्थेची पावले ओळखत वाहन उद्योगाच्या पलिकडे जाऊन विमा, वित्त पुरवठा, घरगुती उपकरणे, इलेक्ट्रिक आणि पवन उर्जा अशा विविध क्षेत्रांमध्ये बजाज उद्योगाचा पाया विस्तारला. कै.बजाज यांनी मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, भारतीय उद्योग महासंघ अशा विविध संघटनांचे अध्यक्षपद भूषवून उद्योग क्षेत्राचे नेतृत्व केले. "बुलंद भारत की बुलंद तस्वीर, हमारा बजाज" हीच त्यांची ओळख होती. देशभक्ती, उद्योगावरील निष्ठा आणि विकासासाठी दृष्टी हीच त्यांची खरी 'श्रीमंती' होती.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

मा. उपाध्यक्ष...

केवळ व्यवसायाकडेच लक्ष न देता त्यांनी सामाजिक बांधिलकीही जपली. जमनालाल बजाज फाऊंडेशनच्या माध्यमातून त्यांनी शाळा, आयटीआय, ग्रामीण महिलांना रोजगार प्रशिक्षण अशा कार्यात भरघोस वाटा उचलला. 'दातृत्व' हे बजाज उद्योग समुहाचे मूळ वैशिष्ट्य आहे.

उद्योग आणि व्यापार क्षेत्रांतील महत्वपूर्ण कामगिरीबद्दल कै. बजाज यांना सन २००१ मध्ये भारत सरकारने 'पद्मभूषण' पुरस्काराने सन्मानित केले होते. 'नाईट (Knight) ऑफ द नॅशनल ऑर्डर ऑफ द लिजन ऑफ ऑनर' हा फ्रान्सचा सर्वोच्च नागरी सन्मान त्यांना प्राप्त झाला होता. सन २००६ मध्ये ते राज्यसभेवर निर्वाचित झाले होते.

अशा या देशाच्या औद्योगिक जडणघडणीमध्ये मोठे योगदान देणाऱ्या, द्रष्टया व समाजाभिमुख उद्योगपतीचे शनिवार, दि. १२ फेब्रुवारी, २०२२ रोजी दुःखद निधन झाले.

असुधारित प्रत

मा. उपाध्यक्ष...

कै. नारायण ज्ञानदेव उर्फ एन.डी.पाटील यांचा जन्म १५ जुलै, १९२९ रोजी सांगली जिल्ह्यात वाळवा तालुक्यातील ढवळी येथे झाला. त्यांचे शिक्षण एम.ए., एलएल.बी. पर्यंत झाले होते.

कै. पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापक मंडळाचे सदस्य, महात्मा फुले शिक्षण संस्थेचे संस्थापक, सातारा येथील बाबासाहेब आंबेडकर अकादमीचे अध्यक्ष तसेच दक्षिण महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे अध्यक्ष म्हणून उत्तम कार्य केले होते.

कै. पाटील यांनी अनेक जनआंदोलनात सक्रिय सहभाग घेतला होता. त्यांनी महाराष्ट्र सीमा प्रश्न चळवळ, कोल्हापूर टोल विरोधी कृती समिती तसेच महाराष्ट्र राज्य अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे नेतृत्व केले होते. शेतकरी कामगार पक्षाने केलेल्या विविध आंदोलनात त्यांचा सक्रिय सहभाग होता.

कै. पाटील सन १९६०-१९६६, १९७०-१९७६ व १९७६-१९८२ या कालावधीत महाराष्ट्र विधानपरिषदेचे तर १९८५-१९९० या कालावधीत महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य होते. त्यांनी ऑगस्ट, १९७८ ते फेब्रुवारी,१९८० या कालावधीत सहकार खात्याचे मंत्री म्हणून उत्तम कार्य केले होते. त्यांनी आपल्या मंत्रीपदाच्या कालावधीत कापूस खरेदी एकाधिकार योजनेची यशस्वी अमंलबजावणी करून शेतकऱ्यांच्या कापसाचे पैसे तात्काळ मिळण्याची सोय करून शेतकऱ्यांमध्ये या योजनेची विश्वासार्हता वाढविली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठाने त्यांना मानद डि.लिट. पदवी प्रदान केली होती.

गेली सहा दशके महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात आपल्या कर्तृत्वाचा अमीट ठसा उमटविणाऱ्या तसेच वंचित, शोषित, कष्टकरी जनतेसाठी अविरतपणे कार्य करणाऱ्या या कर्मयोग्याचे सोमवार, दि. १७ जानेवारी, २०२२ रोजी दु:खद निधन झाले.

असुधारित प्रत

मा. उपाध्यक्ष...

कै. गजानन धरमशी बाबर यांचा जन्म १ मार्च १९४३ रोजी सातारा जिल्ह्यात वाई तालुक्यातील किकली येथे झाला. त्यांचे शिक्षण आठवी पर्यंत झाले होते.

कै. बाबर यांनी नवनगर विकास शिक्षण संस्था, कमला नेहरु शिक्षण संस्था, तसेच सरस्वती विद्यामंदिरचे संस्थापक अध्यक्ष म्हणून उत्तम कार्य केले होते. त्यांनी जिजामाता नागरी सहकारी पतसंस्था, गजानन मजूर संस्था, किकली नवभारत विकास सेवा सोसायटी तसेच गजानन लोकसेवा सहकारी बँकेचे संस्थापक – संचालक म्हणूनही कार्य केले होते. कामगारांना न्याय हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी कामगार संघटनांचे नेतृत्व केले होते.

कै. बाबर यांनी तीन वेळा पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे नगरसेवक तसेच विरोधी पक्ष नेता म्हणून कार्य केले होते. सन १९९५ व १९९९ मध्ये ते पुणे जिल्ह्यातील हवेली मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते. ते सन २००९ मध्ये लोकसभेवरही निर्वाचित झाले होते. विधानमंडळाच्या तसेच संसदेच्या अनेक समित्यांवर त्यांनी कार्य केले होते.

अशा या समाजसेवकाचे बुधवार, दिनांक २ फेब्रुवारी, २०२२ रोजी दु:खद निधन झाले.

यानंतर श्रीमती कोळगिरे...

असुधारित प्रत

उपाध्यक्ष....

कै. विश्वासराव आत्माराम पाटील यांचा जन्म १ ऑक्टोबर १९३४ रोजी सांगली जिल्ह्यात वाळवा तालुक्यातील शिगाव येथे झाला. त्यांचे शिक्षण बी. ए., एलएल. बी. पर्यंत झालेले होते. कै. पाटील यांनी सुरुवातीस काही काळ अध्यापनाचे कार्य केले होते. त्यांनी महाराष्ट्र राज्य वीज मंडळाचे सदस्य, वाळवा तालुका सहकारी साखर कारखान्याचे संचालक म्हणून उत्तम कार्य केले होते. राजाराम बापू सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेत त्यांचा मोलाचा वाटा होता. वाळवा तालुक्यातील अनेक सहकारी तसेच सामाजिक संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. कै. पाटील सन १९८० मध्ये सांगली जिल्ह्यातील वाळवा मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते. अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे सोमवार, दिनांक ७ फेब्रुवारी, २०२२ रोजी दु:खद निधन झाले.

कै. डॉ. नरेंद्रसिंग भगतसिंग पाडवी, माजी वि.स.स. यांचा जन्म १ जून, १९५९ रोजी धुळे जिल्ह्यात अक्कलकुवा तालुक्यातील भगदरी येथे झाला. त्यांचे शिक्षण एम.बी.बी.एस. पर्यंत झाले होते. कै. पाडवी यांनी दीनदयाळ वनवासी विकास संस्थेचे संस्थापक म्हणून उत्तम कार्य केले होते. त्यांनी भगदरी येथे स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना करुन आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय केली. आदिवासी समाजाच्या विकासासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले होते. कै. पाडवी हे सन १९९५ मध्ये धुळे जिल्ह्यातील तळोदा मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते. अशा या समाजसेवकाचे मंगळवार, दिनांक ८ फेब्रुवारी, २०२२ रोजी दु:खद निधन झाले.

कै. आशाताई मारोतीअप्पा टाले, माजी वि.स.स. यांचा जन्म १ जानेवारी, १९३१ रोजी ठाणे जिल्ह्यातील कल्याण येथे झाला. त्यांचे शिक्षण दहावीपर्यंत झाले होते. कै. टाले यांनी हिंगोली नगरपरिषदेच्या सदस्या तसेच नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठाच्या सिनेट सदस्या म्हणून उत्तम कार्य केले होते. हिंगोली मतदारसंघातील अनेक सामाजिक, शैक्षणिक संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. हिंगोली जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी विशेष योगदान दिले होते. कै. टाले सन

असुधारित प्रत

उपाध्यक्ष....

१९६४ ते १९७० या कालावधीत महाराष्ट्र विधानपरिषदेच्या तर सन १९७२ मध्ये त्या हिंगोली मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाल्या होत्या. विधानमंडळाच्या अनेक समित्यांवर त्यांनी काम केले होते. अशा या ज्येष्ठ समाजसेविकेचे शुक्रवार, दि. २२ जानेवारी, २०२१ रोजी दु:खद निधन झाले.

सन्माननीय सदस्यांनी स्तब्ध उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी विनंती आहे.

(सन्माननीय सदस्य उभे राहतात.)

सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत व विधानमंडळाचे स्मृतीपत्र शोकाकुल कुटुंबियांकडे पाठविण्यात येईल.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक उद्या शुक्रवार, दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून ५८ मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक ४ मार्च, २०२२ रोजीच्या सकाळी ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत